| MHBI150000962009 | **<u>नियमीत दिवाणी दावा क्रमांक १९/२००९ मधील</u>**<br>**<u>निशाणी क्र. ९२ वरील आदेश</u>** |
|---|---|

[०१] प्रस्तुतचा अर्ज हा वादीने भारतीय मुदत कायदा, कमल ५ प्रमाणे प्रतिवादी क्र.३ चे कायदेशीर वारस अभिलेखावर घेण्यास झालेला उशीर माफ करण्याच्या विनंतीसह सादर केलेला आहे.

[०२] प्रतिवादीच्या विद्वान वकिलांनी अर्जाच्या पाठीमागील पानावर म्हणणे सादर करत, अर्जास तिव्र विरोध करत अर्ज नामंजुर करण्याची मागणी केली.

[०३] अर्जाचे, त्यावरील म्हणण्याचे आणि अभिलेखाचे अवलोकन केले.

[०४] दोन्ही बाजुच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

[०५] प्रस्तुतचा दावा हा वादीने निरंतर मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. म्हणजेच प्रस्तुतच्या दाव्यात दोन्ही पक्षकारांचे स्थावर मिळकतीसंदर्भात हक्क व अधिकारांचा विषय आहे. यात काही एक शंका नाही की, वारंवार संधी दिल्यानंतर देखील वादीच्यावतीने मागील पाच वर्षा पेक्षा जास्त कालावधीत प्रतिवादी क्र.३ चे वारस अभिलेखावर घेण्यात कसुर केलेला आहे. एकुणच दाव्याच्या स्वरुपाचा, पक्षकारांच्या हिताचा आणि प्रस्तुतच्या दाव्याचा निकाल गुणवत्तेवर होणेसाठी वादीस संधी देणे योग्य होईल. तसेच अर्जात नमुद कारणाचा विचार करता, झालेला उशीर माफ करणे न्यायोचित होईल. एकुणच वरनमुद कारणांचा विचार करता, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

(१) निशाणी क्रमांक ९२ वरील अर्ज रक्कम रुपये २,०००/- च्या खर्चावर मंजुर करण्यात येत आहे.

(२) प्रतिवादी क्र. ३ चे वारस अभिलेखात समाविष्ठ करण्यासाठी

झालेला ५ वर्ष २ महिने १३ दिवसांचा उशीर पुढील तारेखे पावेतो रक्कम रुपये २,०००/– न्यायालयात भरण्याच्या अटीवर माफ करण्यात येत आहे.

(३) यदाकदाचित वादीने पुढील तारेखे पावेतो खर्चाची रक्कम रुपये २,०००/– न्यायालयात भरण्यास कसुर केल्यास प्रस्तुतचा अर्ज न्यायालयाच्या स्वतंत्र आदेशाशिवाय आपोआप नामंजुर समजण्यात यावा.

(४) वादीने पुढील तारखेपावेतो खर्चाची रक्कम रुपये २,०००/– न्यायालयात जमा केल्यास ती मयत प्रतिवादी क्र.३ च्या वारसांना देण्यात यावी.

(५) प्रस्तुतच्या अर्जाचा खर्च वादीने सोसावा.

Digitally signed by PANKAJ MANMOHAN BIDADA
Date: 2022.02.09 17:28:42 +0530

(पंकज म. बिदादा)

दिनांक:– ०९.०२.२०२२. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, पाटोदा.

# <u>CERTIFICATE</u>

I affirm that the contents of this PDF file Order / Judgment are same word to word, as per the original Order / Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer Grade-3 | : A.D. Bavne, Sd/- |
| Name of the Court | : C.J.J.D. & J.M.F.C., Patoda. |
| Dictated on | : 09/02/2022 |
| Transcribed on | : 09/02/2022 |
| Checked & signed on | : 09/02/2022 |
| Judgment / Order uploaded on | : 09/02/2022 |